# श्री. देवरावजी विठोबाजी खवसे

सेवक क्र. ५९९

खापरीपुरा, इतवारी, नागपूर

**मी या तत्वाचा उपासक कसा झालो :**

या मार्गावर येण्याच्या आधी माझ्या पत्नीला टी.बी. चा आजार होता. त्याकरिता मी बराच पैसा खर्च केला पण काहीच आराम झाला नाही. टी.बी. च्या आजाराकरिता मी डॉ. लाखे व डॉ. नाईक यांच्याकडून पत्नीकरिता बरीच औषधे घेतली. पण हा आजार कमी होण्याचे चिन्ह दिसेना. त्याबरोबर मी अनेक देव व देवतांना विनवणी केली. परंतु त्याचा काहीच फायदा झाला नाही. त्यामुळे आम्ही कुटुंबातील लोक फार बेचैन झाली. आमच्यावर निराश होण्याची पाळी आली. एके दिवशी नळाच्या कामाकरिता या तत्वाचे एक सेवक श्रीमान शंकररावजी धार्मिक यांच्याकडे जाण्याचा योग आला. त्यांनी माझा निराश चेहरा पाहून विचारपूस केली. त्यामुळे मी कुटुंबात असलेल्या दुःखाबद्दल त्यांना सांगितले. त्यावेळी त्यांनी भगवान बाबा हनुमानजीच्या उपासनेने टी.बी., कॅन्सर आणि महारोग सारखी दुःख सहज दुरुस्त होतात, असे सांगून या तत्वाविषयी सविस्तर माहिती दिली. माझ्या कुटुंबात दुःख असल्यामुळे आम्ही या तत्वावर असलेले सर्व नियम मान्य केले आणि केले आणि एका भगवंताच्या चरणी राहण्याकरिता ७ दिवस, ११ दिवस व ४२ दिवसांची अगरबत्ती घेतली. बेचाळीस दिवसांच्या पक्क्या अगरबत्तीमुळे सकाळी ठरलेल्या वेळेस पुजेला बसलो असता एके दिवशी कापूस लावून भगवान बाबा हनुमानजीला विनंती करीत असताना कापूर जाळणी हळूहळू अंदाजे नऊ इंच पुढे सरकत गेली. कापराची ज्योत विझल्यावर मी पत्नीला विचारणार तोच मी मला म्हणालो की तुम्ही या ठिकाणी काही चमत्कार पाहिला काय? मी तिला म्हणालो ही कापूर आरती पुढे सरकत असताना पाहिली. त्या कापूर-आरतीच्या खाली काही किड्या मुंग्या असतील या शंकेने आम्ही ती कापूर आरती उचलून पाहिली. पण त्या कापूर आरतीच्या खाली काहीच नव्हते. त्यावेळेस मनाला समाधान वाटले की भगवान बाबा हनुमानजींनी आपल्यावर कृपा केली. जगात मी यासारखी सत्य कृपा कधीच पाहिली नव्हती. तेव्हापासून माझ्या पत्नीची बिमारी दुरुस्त होऊ लागली. आणि आमच्या कुटुंबात समाधान नांदू लागले. तसेच आमच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली.

या मार्गावर असलेल्या सेवकांना बाबांनी दिलेल्या तत्व, शब्द, नियम यांचे कुटुंबात आचरण करीत असताना झालेल्या चुकीमुळे कसे प्रसंग ओढवतात. याचे

माझ्या कुटुंबात प्रत्यक्ष घडलेले उदाहरण मी देत आहे. एके वर्षी संक्रांतीच्या दिवशी पतंगीच्या दोऱ्यावरुन माझ्या लहान दोन मुलांत भांडण झाले आणि ते एकमेकांना वाईट शिव्या देऊ लागले. लहान मुलांचे भांडण व त्याचे वाईट बोलणे हे त्यांच्या आईला एकवेनासे झाल्यामुळे तिने रागाच्या भरात तुम्ही असेच भांडण करत असाल तर मी एकेकाला बाजुच्या विहीरीत टाकुन देईल असे उद्गार काढले. हे काढलेले वाईट शब्द भगवंतांनी ऐकले आणि त्याच रात्री एक दुःखद घटना घडली. दुसऱ्या दिवशी एक मुलगा शाळेच्या सहलीला जाणार म्हणून पत्नी डबा करण्याकरिता पहाटेला उठली. ती वेळ अंदाजे पाच वाजताची होती. सोबत लहान मुलगा उठला आणि हळूहळू सर्व मुले उठली. लहान मुलाला जाळीच्या पाळण्यात टाकून पत्नी स्वयंपाक करायला बसली. त्यावेळी मी शौचालयात गेलो होतो. पण त्या मधल्या वेळात पाळण्यात झोपलेला मुलगा खाली पडला. तो अर्धा कोपरात व अर्धा कोपरा बाहेर. तो फक्त सव्वा वर्षाचा होता. दुसरा मुलगा पलंगावरुन असा पडला की त्याचा अर्धा भाग पलंगावर व अर्धा भाग पलंगाबाहेर. त्याची जीभ बाहेर निघालेली होती. तसेच तिसरा मुलगा पलंगावर बेहोश पडला होता. अशा बिकट परिस्थितीत तिला काहीच सुचेनासे झाले आणि हंबरडा फोडून ती रडायला बसली. तोच शेजारचे लोक धावून आले. त्यापैकी एकजण माझ्याजवळ धावत आला आणि म्हणाला आणि म्हाला की तुम्ही लवकर बाहेर या. मी लगेच बाहेर आल्यानंतर तसाच घरात शिरलो आणि पाहतो तर मुले मरणाच्या अवस्थेत पडली होती. मी पण भांबावून गेलो होतो. तेव्हा मी भगवंताच्या प्रतिमेजवळ गेलो आणि भगवंताला विनंती केली की, ''हे भगवान बाबा हनुमानजी हे आपण दिलेले फख आहे जर हे आपले असेल तर आपण न्या नाहीतर माझे असेल तर मला द्या'' अशी विनंती करुन अकरा वेळा बाबा हनुमानजीच्या नावाने फुक मारुन तीर्थ करुन दिले. याप्रमाणे क्रवार तीर्थ करुन मुलांना दिले. तेव्हा सर्वच मुले पुर्वीप्रमाणे खेळु लागली आणि माझ्या कुटुंबावर आलेला दारुण प्रसंग टळला. नंतर लगेच मी आंघोळ करून महानत्यागी बाबा जुमदेवजीकडे जाऊन त्यांना सर्व हकीकत सांगितली. तेव्हा बाबा म्हणाले की, सर्व सेवकांना जे तत्व, शब्द, नियम दिले आहेत आणि त्याचे पालन न झाल्यामुळे तुमच्यावर हा प्रसंग ओढवला. भगवान बाबा हनुमानजीला सतत जवळ ठेवण्याकरिता महानत्यागी बाबा जुमदेवजी यांनी दिलेले तत्व, शब्द व नियतांचे पालन केले पाहिजे. परमेश्वर हा सत्य आहे आणि तो प्रत्येक नर-नारीमध्ये चोवीस तास वास करीत असतो ही जाणीव प्रत्येक सेवकाने ठेवली पाहिजे.

* * * * *